# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः21.11.2023** **वारः मंगळवार**

---

1. भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातलं सहकार्य हिंद प्रशांत क्षेत्रासाठी लाभदायक-परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर एस जयशंकर यांचं प्रतिपादन
2. राजस्थान, तेलंगणमध्ये विधानसभा निवडणूक प्रचाराचा धडाका
3. भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात अर्थात ईफ्फी मध्ये आज इंडियन पॅनोरमाला सुरूवात आणि
4. आंतरराष्ट्रीय बिलियर्ड अजिंक्यपदासाठी भारताच्या पंकज अडवाणी आणि सौरव कोठारी यांच्यात लढत

**<u>भारत ऑस्ट्रेलिया</u>**

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्या परराष्ट्र व्यवहार आणि संरक्षण मंत्र्यांची बैठक काल नवी दिल्लीत झाली. परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर एस जयशंकर, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह तसंच ऑस्ट्रेलियाचे परराष्ट्र व्यवहार मंत्री पेनी वाँग, संरक्षण मंत्री रिचर्ड मार्ल्स बैठकीला उपस्थित होते. या बैठकीत संरक्षण आणि सुरक्षा, व्यापार आणि गुंतवणूक, दुर्मिळ खनिजं, ऊर्जा, हवामान बदल, विज्ञान आणि तंत्रज्ञान, अंतराळ विज्ञान, शिक्षण आणि दोन्ही देशांच्या नागरिकांचे परस्परसंबंध या विषयांवर चर्चा झाली.

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातले परस्परसंबंध वेगानं विकसित होत असून त्याचा क्षेत्रिय परिणामही मोठ्या प्रमाणात होत आहे असं परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यावेळी म्हणाले. क्वाड देशांमधल्या भारत आणि ऑस्ट्रेलियाचं सहकार्य हिंद प्रशांत क्षेत्रासाठी फायदेशीर ठरत असल्याच्या मुद्द्याकडे त्यांनी लक्ष वेधलं. दोन्ही देश मिळून अन्य देशांमध्ये एकत्र कामाच्या संधींचा आढावा घेतील असं जयशंकर यांनी सांगितलं.

**<u>टांझानिया</u>**

केंद्रीय परराष्ट्रव्यवहार राज्यमंत्री व्ही. मुरलीधरन यांनी काल टांझानियाचे राष्ट्राध्यक्ष हुसेनअली म्विनी यांची झांझिबारमध्ये भेट घेतली. दोन्ही देशातीलसंबंध मजबूत करण्यासाठी राष्ट्राध्यक्ष म्विनी यांच्या दृढ पाठिंब्याबद्दल आणि आयआयटीमद्रासच्या झांझिबार कॅम्पसला मिळालेल्या अमूल्य सहकार्याबद्दलही त्यांनी कृतज्ञताव्यक्त केली. टांझानियाच्या दौऱ्यावर असलेल्या मुरलीधरन यांनी काल आयआयटी

मद्रासच्या झांझिबार कॅम्पसला भेट देत विद्यार्थी आणि प्राध्यापकांशीही संवाद साधला. या दौऱ्यात ते दोन्ही देशांमधीलद्विपक्षीय व्यापार आणि गुंतवणुकीसंदर्भात बैठकीचं अध्यक्षस्थानही भूषवणार आहेत. तसंच दार-एस-सलाममधल्या भारतीय समुदायाशीही संवाद साधणार आहेत.

**<u>गुंतवणूकदार सुरक्षा परिषद</u>**

डिजिटल युगात गुंतवणूकदारांच्या सुरक्षेत आर्थिक सल्लागारांची भूमिका आणि महत्त्व याविषयीची परिषद काल मुंबईत झाली. गुंतवणूकदार शिक्षण आणि सुरक्षा निधी प्राधिकरणानं राष्ट्रीय उपयोजित आर्थिक संशोधन मंडळ तसंच राष्ट्रीय शेअर बाजाराच्या सहकार्यानं ही परिषद आयोजित केली होती. परिषदेत सरकारी संस्था, शैक्षणिक संस्थांचे प्रतिनिधी आणि उद्योग क्षेत्रातले तज्ज्ञ सहभागी झाले होते. गुंतवणूकदारांचं शिक्षण, तंत्रज्ञान साक्षरता आणि व्यवहारातली पारदर्शकता यासाठी गुंतवणूकदार शिक्षण आणि सुरक्षा निधी प्राधिकरण अनेक संस्थांसोबत सहकार्य करत आहे असं संस्थेचे महाव्यवस्थापक लेफ्टनंट कर्नल तुषार आनंद यांनी यावेळी सांगितलं.

**<u>निवडणूक प्रचार</u>**

विधानसभा निवडणूक मतदानाला अवघे काही दिवस उरले असल्यानं राजस्थान आणि तेलंगणमध्ये प्रचार शिगेला पोहोचला आहे. मतदारांवर प्रभाव टाकण्यासाठी सर्वच राजकीय पक्ष सर्व प्रकारच्या क्लृप्त्या वापरत आहेत. प्रमुख प्रचारकांच्या सभा, रोड शो धडाक्यात सुरू आहेत. राजस्थानमध्ये भाजपाचे प्रमुख नेते, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल पाली आणि पिलीबंगा मतदारसंघात जाहीर सभा घेतली. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे पी नड्डा यांनीही अनेक ठिकाणी सभा घेतल्या. तर काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी श्रीगंगानगर आणि हनुमानगड इथं सभा घेतल्या. राजस्थानमध्ये येत्या शनिवारी मतदान होणार आहे. तेलंगणमध्येही राष्ट्रीय आणि प्रादेशिक पक्षांमध्ये जाहीर सभा, रोड शो, प्रचार रॅली यांची चढाओढ सुरू आहे. तेलंगणमध्ये 30 नोव्हेंबरला मतदान होणार आहे.

**<u>ईफ्फी-गोवा</u>**

गोव्यात सुरू असलेल्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात अर्थात ईफ्फी मध्ये आज इंडियन पॅनोरमाला सुरूवात होणार आहे. केंद्रीय माहिती आणि प्रसारणमंत्री अनुराग सिंह ठाकूर इंडियन पॅनोरमाच्या उद्घाटन सोहळ्याला उपस्थित राहणार आहेत. या विभागात 25 चित्रपट आणि 20 कथाबाह्य चित्रपट दाखवण्यात येतील. आनंद एकरसाही दिग्दर्शित मल्याळम भाषेतला ‘अट्टम’ हा इंडियन पॅनोरमा विभागातला पहिला चित्रपट असेल. तर कथाबाह्य विभागात मीना लोंगजम दिग्दर्शित ‘अँड्रो ड्रीम्स’ हा माहितीपट सुरुवातीला दाखवण्यात येईल. इंडियन पॅनोरमा विभागात दाखवल्या जाणार्याप इतर चित्रपटांमध्ये विवेक अग्निहोत्री दिग्दर्शित हिंदी चित्रपट 'द व्हॅक्सिन वॉर', ऋषभ शेट्टी दिग्दर्शित कन्नड चित्रपट 'कांतारा' आणि कौशिक गांगुली दिग्दर्शित बंगाली चित्रपट 'अर्धांगिनी' यांचा समावेश आहे. यावेळी अनुराग सिंह ठाकूर यांच्या हस्ते '75 क्रिएटिव्ह माइंड्स ऑफ टुमारो' या तरुण कलाकारांसाठीच्या विशेष उपक्रमाचंही उद्घाटन करण्यात येणार आहे.

**जागतिक मत्स्य परिषद**

अहमदाबाद इथल्या सायन्स सिटी इथं आयोजित जागतिक मत्स्यव्यवसाय परिषद 2023 चं उद्घाटन आज केंद्रीय मत्स्यव्यवसाय मंत्री पुरुषोत्तम रुपाला यांच्या हस्ते होणार आहे. उद्घाटन सत्राला गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल, मत्स्यव्यवसाय राज्यमंत्री डॉ. एल मुरुगन आणि डॉ. संजीव कुमार बल्यान यांच्यासह सुमारे 10 देशांचं उच्चस्तरीय शिष्टमंडळ, आंतरराष्ट्रीय संस्था तसंच मत्स्य व्यवसाय संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. दोन दिवस चालणाऱ्या या परिषदेत विविध मत्स्य उद्योगाशी संबंधित घटकांना एकाच व्यासपीठावर एकत्र आणण्यात आलं आहे. मत्स्यपालन तंत्रज्ञानाचं प्रदर्शन, अत्याधुनिक मत्स्यपालन आणि मत्स्यव्यवसाय क्षेत्रातील नावीन्यपूर्ण उपक्रम आदींची सविस्तर माहिती या परिषदेत उपलब्ध करून दिली जाणार आहे.

**आरबीआय**

भारतीय रिझर्व्ह बँकेनं नियमभंग केल्या प्रकरणी तीन बँकांना दंड ठोठावला आहे. नाशिक मर्चंट सहकारी बँकेला फसवणुकीच्या तक्रारी दाखल करण्यात दिरंगाई करण्यावरुन तसंच ग्राहकांना कोणतीही पूर्वसूचना न देता कमीत कमी शिलकीच्या रकमेवरुन दंड आकारल्याप्रकरणी 48 लाख 30 हजारांचा दंड भरण्यास आरबीआयनं सांगितलं आहे. मेहसाणा अर्बन बँकेला अपात्र विश्वस्त संस्थांची बचत खाती उघडल्याप्रकरणी 15 लाख रुपये तर सांगली सहकारी बँकेला संचालकांच्या नातेवाईकाच्या कर्जाची पुनर्रचना करण्यावरुन 2 लाखांचा दंड ठोठावण्यात आला आहे. या तिनही बँकांना आरबीआयनं आधी नोटीस पाठवली होती मात्र त्याला समाधानकारक उत्तर न मिळाल्यामुळे दंडात्मक कारवाई केल्याचं आरबीआयनं म्हटलं आहे.

**अमेरिका युक्रेन**

अमेरिकेनं युक्रेनला नव्यानं 10 कोटी अमेरिकी डॉलर्सची लष्करी मदत देऊ केली आहे. अमेरिकेचे संरक्षण मंत्री लॉइड ऑस्टीन यांनी काल कीव इथं ही घोषणा केली. अमेरिका दीर्घकाळ युक्रेनला सहाय्य करेल असं आश्वासनही त्यांनी आपल्या युक्रेन दौऱ्यादरम्यान दिलं. अमेरिकेत पुढच्या वर्षी होणाऱ्या अध्यक्षपदाच्या निवडणुका आणि युक्रेनला मदत करण्यावरुन तिथल्या संसद सदस्यांमधले वाढते मतभेद या पार्श्वभूमीवर ऑस्टीन यांचा युक्रेन दौरा महत्त्वाचा मानला जात आहे.

**इस्राइल-हमास**

इस्राइल आणि हमासनं तात्पुरत्या युद्धबंदीला संमती दिल्याच्या वृत्ताचा अमेरिकेनं इन्कार केला आहे. अद्याप यासंबंधी करार झाला नसला तरी अमेरिका त्यासाठी प्रयत्न करतच राहील असं व्हाइट हाउसचे प्रवक्ते ॲड्रेइन वॉटसन यांनी म्हटलं आहे. इस्राइल आणि हमासनं पाच दिवसांचा युद्धविराम घेतल्याचं तसंच 50 ओलिसांची सुटका होण्याची शक्यता असल्याचं वृत्त अमेरिकेतल्या एका दैनिकानं दिलं होतं. दरम्यान, वॉशिंग्टनमधल्या इस्राइली दूतावासानंही युद्धविरामाचं वृत्त तसंच ओलिस ठेवलेल्या

नागरिकांच्या स्थितीबाबत प्रतिक्रिया देण्यास नकार दिला.

**बिलियर्ड स्पर्धा**

कतार मधल्या दोहा इथ सुरु असलेल्या आंतरराष्ट्रीय बिलियर्ड अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम फेरीत भारताच्या पंकज अडवाणी आणि सौरव कोठारी या दोन्ही खेळाडूंनी प्रवेश केला आहे. या स्पर्धेची अंतिम फेरी आता या दोघांमध्ये होणार आहे. दोहा इथ काल झालेल्या उपांत्य सामन्यात यापूर्वी 25 वेळा विजेतेपद पटकावलेला भारतीय बिलियर्ड खेळाडू पंकज अडवाणी याने भारताच्याच रुपेश शाह याचा पराभव केला तर दुसऱ्या उपांत्य सामन्यात सौरव कोठारी याने ध्रुव सीतवाला याचा पराभव केला.

**टी 20 संघ**

ऑस्ट्रेलियासोबतच्या वीस षटकांच्या क्रिकेट मालिकेसाठी काल भारतीय संघ जाहीर करण्यात आला. फलंदाज सुर्यकुमार यादव या संघाचा कर्णधार असेल तर पाच सामन्यांच्या मालिकेतल्या पहिल्या तीन सामन्यांसाठी ऋतुराज गायकवाडची उपकर्णधार म्हणून निवड करण्यात आली आहे. उर्वरित दोन सामन्यांसाठी श्रेयस अय्यर भारतीय संघाचा उपकर्णधार असेल. रोहित शर्मा, विराट कोहली, मोहम्मद शामी आणि जसप्रीत बुमराह या वरीष्ठ क्रिकेटपटूंना या मालिकेत विश्रांती देण्यात आली आहे.

**दिल्ली हवा गुणवत्ता**

दिल्ली-एनसीआरमधल्या हवेची गुणवत्ता खालावली असून 'अत्यंत वाईट' या श्रेणीपर्यंत घसरली आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळानं दिलेल्या माहितीनुसार, आज सकाळी 7 वाजता शहरातील हवा गुणवत्तानिर्देशांक 396 इतका नोंदवला गेला.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.